सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांचे कर आकारणी पुस्तकातील नावाचे हस्तांतर करणेबाबत..

**सोलापूर महानगरपालिका**
**मालमत्ता कर आकारणी व कर संकलन विभाग**
**अंतर्गत निर्देश क्र.05**
**दि. / /2021**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

ज्याअर्थी महानगरपालिका क्षेत्रात महाराष्ट्र मनपा अधिनियमाच्या प्रकरण 8 मधिल नियम 9 (क) मधील तरतुदीनुसार कर आकारणी पुस्तकात कर देण्यास प्रथमत: जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नाव नमुद करण्याची तरतुद आहे,

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाचे अनुसूचितील प्रकरण 8 मधिल नियम क्र.1 (1) अन्वये मालकी हक्काचे हस्तांतरणान्वये फेरफार व दुरुस्ती करण्याचे अधिकार आयुक्त यांना निहीत आहेत,

आणि ज्याअर्थी मालमत्ता कर विभागाच्या मालमत्ता हस्तांतरणात व नावात दुरुस्ती करण्याच्या कामात सुसूत्रता आणण्याची आवश्यकता आहे असे माझे मत झाले आहे.

त्याअर्थी मी, कर निर्धारण पुस्तीकेतील कर देण्यास प्रथमत: जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नांव दुरुस्त करण्याची कार्यपध्दती खालील प्रमाणे ठरवून देत आहे.

1. मालकी हक्काचे हस्तांतरण करण्याचा अर्ज प्राप्त करुन घ्यावा.
2. ज्यांचे नावे हस्तांतरण करावयाचे आहे व ज्यांचे नांव कमी करावयाचे आहे अशा दोन्ही व्यक्तीत लेखी संलेख झालेला असल्यास त्याची नोंदणीकृत प्रत उपलब्ध करुन घ्यावी.
3. नोंदणीकृत संलेख उपलब्ध नसल्यास अर्जावर उपरोक्त दोन्ही व्यक्तिंच्या स्वाक्षऱ्या आवश्यक असतील, तसेच जागेवर ज्यांचे नावे हस्तांतरण करावयाचे आहे, त्यांचा कब्जा असल्याचा पंचनामा करावा. तसेच, ज्यांचे नावे हस्तांतरण करावयाचे आहे त्यांच्याकडून असे हस्तांतरण गैर कायदेशीर कब्जामुळे, चुकीच्या माहितीमुळे किंवा अर्जदाराच्या अफरातफरीमुळे झाल्यास महानगरपालिका जबाबदार असणार नाही असे प्रतिज्ञापत्र (Affidavit) व नुकसान भरपाईचा बंध (Indemnity bond) लिहुन घ्यावा.
4. ज्यांचे नावे हस्तांतरण करावयाचे आहे त्यांच्याकडून अर्ज करण्यात आल्याच्या दिंनाकपर्यंतची संबधीत मालमत्तेवरील कराची थकबाकी पुर्वीच्या मालकाने भरली असल्याची खातरजमा करुन घ्यावी, थकबाकी असल्यास अर्ज नाकारण्यात यावा.
5. दि.06.10.2001 रोजी तत्कालीन आयुक्त यांचे आदेशान्वये हस्तांतरण करत असताना संबधीत जागेच्या करयोग्य मुल्यात 10 टक्के वाढ करावी. असे निर्देश देण्यात आले होते. ते कायम ठेवण्यात येत आहेत.

उपरोक्त पध्दतीचा अवलंब या निर्देशाच्या दिनांकापासून तात्काळ प्रभावाने लागू करण्यात यावा. त्यात हयगय झाल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

**(पि.शिवशंकर** भा.प्र.से**)**
आयुक्त,
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

**प्रत :- माहितीस्तव**

1. अतिरिक्त आयुक्त,
2. उपायुक्त (मुख्यालय),
3. सहा.आयुक्त (मालमत्ता कर)

**प्रत :-**

1. कर आकारणी व कर संकलन विभाग, - योग्य त्या कार्यवाहीस्तव
2. निर्देश नस्ती

Digitally signed by
P.SIVASANKAR
Date:Thu Feb 18 19:52:21 IST
2021
Reason: Approved